- सौ. गीता शहा
विद्यादान सहाय्यक मंडळ, ठाणे.

वेध कडे आम्ही ज्ञानपीठाचे व्यासपीठ म्हणूनच पाहतो. यंदाच्या उत्कंठतेचे कारणही कदाचित यंदाच्या 'वेध'चे सूत्र- 'जगण्याचा ताल व तोल' हे होते. अलीकडे एका ट्रेनिंगच्या कार्यक्रमात GDP (Gross Domestic Product) या शब्दाचा नवीन अर्थ Grossly Depressed People असा ऐकल्यानंतर मनात थोडीशी काळजी लागून राहिली होती आणि त्यामुळे सामान्यातील असामान्य माणसे आजच्या जीवनातील सगळी आव्हाने पेलून स्वत:च्या जीवनातील ताल व तोल सांभाळून आयुष्य सार्थक कसे जगतात, याकडे 'वेध'मुळे 'वेध' लागले होते.

यावर्षी 'वेध'च्या गीताने मनाची खूप शांतता झाली. आनंदाने जगण्याचा मंत्र अतिशय सहजपणे नेमक्या व ठोस शब्दांत मांडला होता. श्री. दाभोळकरांच्या बीजभाषणाने 'वेध'च्या 'सूत्राची' व पुढील 'सत्रांची' पकड आमच्या मनात घट्ट बसली. विज्ञान व धर्म यांतील समन्वय हा ताल व तोल आहे. आपले गुरुत्वमध्य शोधणे हा ताल व तोल यांचा समन्वय आहे. व्यक्ती व समष्टी या दोन पातळ्यांवर असलेल्या या दोहोंचा समन्वय आपण साधण्याचा प्रयत्न निश्चितच केला पाहिजे. त्यांनी सहज कथन केलेली; परंतु मला भावलेली या सत्रातील गोष्ट म्हणजे श्रद्धा ही प्रयत्नांवर असली पाहिजे व तोच धर्म आहे.

पुण्याहून आलेले ज्येष्ठ गायक श्री. आनंद भाटे यांच्या गप्पांमधून पहिल्या सत्राची सुरुवात झाली. 'संगीत ते संगणक' हा खडतर प्रवास त्यांनी स्वत:च्या स्मितहास्याने व आल्हाददायक शैलीने सादर केला. स्वत:च्या आवडीच्या गोष्टीतील ताल व तोल त्यांनी किती जाणीवपूर्वक व नियोजनाने जपला. 'बालगंधर्व या अतिशय 'हीट' झालेल्या सिनेमातील गायक इतक्या नम्रपणे एवढ्या मोठ्या जनसमुदायासमोर शांत चित्ताने बोलतो, हे मला ताल व तोलचे नियोजन वाटते. प्रत्येक निर्णयामागे 'Risk and Rewards' असतात. त्यामुळे काही गोष्टी मिळतील; पण काही मिळणार नाहीत, याची जाणीव आपण आपली ठेवली पाहिजे. त्यावेळी पुन्हा एकदा निर्धाराचा 'च' व हट्टाचा 'च' आठवला. आय.टी.सारख्या क्षेत्रातील नोकरीतून संगीतसाधनेसाठी घेतलेली दीर्घ सुट्टी ही पुन्हा एकदा 'ताल व तोलत या विषयाकडे घेऊन गला.

शनिवारच्या पहिल्या सत्रात Judo (Gental way of Marshal Art) Sports मध्ये असलेल्या मॉथ्यू कुटुंबियाला भेटलो. कुटुंब रंगलंय काव्यात त्याप्रमाणे हे कुटुंब 'ज्युदो' या खेळात रमल्याचे दिसले. पूर्वाच्या उत्तरातून एक खास आत्मविश्वास दिसला. तिच्या आई-बाबांकडून मुलगी व ज्युदोची विद्यार्थिनी या भूमिकेतील ताल-तोल, शिक्षण व खेळ यांतील समन्वय, आपल्या संस्थेतून ऑलिम्पिकसाठी खेळाडू घडविण्याचे स्वप्न, जीवनात आलेले अनेक निर्णाय प्रसंग, पूर्वाच्या ज्युदो खेळ कायमचे सोडून देण्याचे विचार आल्यानंतर समुपदेशकाने केलेल्या मार्गदर्शनानंतरचा तिचा खेळायचा निर्णय हा ताल व तोल प्रत्येक क्षणी शिकवतो.

श्री. अमोल दिघे हे मूलकण / देवकण संशोधनातील शास्त्रज्ञ. यंदाच्या वर्षी प्रतिष्ठित समजला जाणारा 'डॉ. शांतीस्वरूप भटनागर' या पुरस्काराचे मानकरी म्हणूनच सगळ्यांमध्ये कुतूहल असणारे. शास्त्रज्ञ म्हटल्यावर डोळ्यांसमोर आपल्या विचारांनी बनविलेल्या छबीपेक्षा ही व्यक्ती फारच आगळी-वेगळी निघाली. प्रयोग ते सिद्धान्ताचा प्रवास, अध्यापन व अध्ययन यातील तोल, विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना शास्त्रज्ञाला अनुरूप असे उत्तर, शास्त्रज्ञ होण्यासाठी आवश्यक जाणिवा, वर्गातील अर्धी जागा फळा व अर्ध्या जागेतील Projector याचे मार्मिक उत्तर, घरी आल्यानंतर Office चा Swith off व Office मध्ये पोहोचल्यानंतरचा Switch on ही वेगळी उत्तरे 'ताल व तोल'कडेच नेत होती.